लोकमत



गडहिंग्लज येथे 'इफको-टोकीओ'चे सुप्रिया तेंडुलकर व आशिष साळी यांच्याकडे एम. एल. चौगुले यांनी विमा हप्त्याचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी उपाध्यक्ष वासुदेव मायदेव, सर्व संचालक उपस्थित होते.

# 'रवळनाथ'च्या कर्जदारांना विमा संरक्षण

## एम. एल. चौगुले : पाच लाखांची अपघात विमा योजना

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** २५ लाखांपर्यंत घरबांधणी व प्लॉट खरेदी कर्ज घेतलेल्या १३८५ सभासदांचा संस्थेतर्फे पाच लाखांचा अपघात विमा उतरविला आहे. यापुढील कर्जदाराचांही या योजनेत समावेश करण्यात येईल, अशी माहिती रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी वार्षिक सभेत दिली.

यावेळी चौगुले यांनी पुणे, कराड व सांगली येथे शाखा सुरू करण्याची घोषणा केली. ठेव संकलन, कर्ज वितरण, थकबाकी वसुलीत शहरी विभागात प्रथम कोल्हापूर आणि ग्रामीण विभागात प्रथम चंदगड शाखाध्यक्षांसह पंचाहत्तरीत पदार्पण केलेले सभासद, सेवानिवृत्त सभासद व यशवंत पाल्यांचा सत्कार झाला. कार्यक्षेत्रात संपूर्ण कर्नाटक राज्याचा समावेश करण्यास मंजुरी मिळाली.

यावेळी विलासचंद हजारे, सदाशिव पिटके, पुष्पा नेसरीकर, विजय हरगुडे यांनी मनोगत व्यक्त केले. चर्चेत सुहास नाडगौडा, महावीर मरजे, कृष्णा येसणे, सुदेश गंध यांनी भाग घेतला.

सीईओ दत्तात्रय मायदेव यांनी विषयपत्रिका, तर सागर माने यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचले. रामचंद्र निळपणकर, महेश मजती, विजयकुमार घुगरे, विजय आरबोळे, उमा तोरगल्ली, रेखा पोतदार यांनी विषयवाचन केले.

संचालक किरण पोतदार, मीना रिंगणे, सुशांत करोशे, संजय चौगुले, आनंद मेणसे, के. एस. पाटील, प्रकाश हेरेकर, राजाराम पाटील, विनायक आजगेकर, अशोक येजरे, शिवशंकर उपासे, नवनाथ शिंदे, बाबासाहेब आजरी, रंगा शिंगटे, संदीप पोटजाळे उपस्थित होते. संचालक दत्ता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष वासुदेव मायदेव यांनी आभार मानले.

### कारखान्यासाठीही पुढाकार घ्यावा : पाटील

गडहिंग्लज अर्बन बँकेला ऊर्जितावस्था देण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याबद्दल अध्यक्ष चौगुले यांच्या अभिनंदनासह गडहिंग्लज कारखाना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी संस्थेने पुढाकार घ्यावा, या रमेश पाटील यांनी मांडलेल्या ठरावाला मंजुरी मिळाली.